# 'साळगावकर'मध्ये हृदयरोग उपचार केंद्र

पणजी, ता. २६: हृदय विकारावर संपूर्ण सेवा देणाऱ्या एसएमआरसी हार्ट सेंटरने गोव्यातील रुग्णांसाठी चिखलीतील व्ही. एम. साळगावकर हॉस्पिटलमध्ये हार्ट सेंटर सुरू केले आहे. एसएमआरसीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून उपचार केले जातात. या रुग्णालयात ५० खाटांची क्षमता असून २४ तास अतिदक्षता केंद्र सुरू असते.

व्हायवस ग्रुपच्या श्रीनिवास कार्डिऑलॉजी सेंटरचे या विभागाला सहकार्य आहे. बंगलोर, मडीकेरी आणि गोवा येथे या ग्रुपची रुग्णालय सेवा पुरवत आहे. या कार्डिअल सेंटरला आयएसओ ९००१ : २००० प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. व्हायवस ग्रुप एमव्ही डायग्नोस्टिक्स आणि सेंट तेरेसा - गायत्री हॉस्पिटलशी जोडला गेलेला आहे.

व्हायवस ग्रुपने मोबाईल लॅबोरेटरीद्वारे ग्रामीण भागांमध्ये सेवा सुरू केली आहे. या ग्रुपने राजीव गांधी विश्व विद्यालयातर्फे मान्यता मिळवलेले दोन फेलोशिप प्रोग्रॅम्स सुरू केलेले आहेत. व्हायवसच्या केंद्राला इग्नूची मान्यता मिळाली आहे. तिथे औषधशास्त्रातील अभ्यासक्रम चालविला जातो. तीन वर्षे कालावधीच्या कार्डिऑलॉजी डीएनबी कार्यक्रमाला मान्यता मिळाली आहे. माहितीसाठी एसएमआरसी हॉस्पिटलला ६६९१६००/६६९१६६६ या क्रमांकांवर संपर्क साधावा.